**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र

Estd. 1962
NAAC 'A' Grade

PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609068
B.A. Exam. Section: 0231-2609116 Website: www.unishivaji.ac.in
E-mail: ba.section@unishivaji.ac.in


---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/४४९७ दिनांक.: २८-८-२०१८.

प्रति,

मा. प्राचार्य,
शिवाजी विद्यापीठ सर्व संलग्नित महाविद्यालये/
मान्यता प्राप्त संस्था

महोदय/महोदया,

विषय :- विलंबाने निकाल जाहिर झालेल्या विद्यार्थ्यांचे पुढील परीक्षा अर्ज सात दिवसात विनाविलंब स्विकारणेबाबत.

मार्च, २०१८ मध्ये झालेल्या सर्व परीक्षांचे निकाल जाहिर झाले आहेत. पात्रता, परीक्षा प्रमाद व काही तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन प्रणालितील विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबीत असतील अशा विद्यार्थ्यांचे निकाल उशीरा जाहिर होतात. दरम्यान अशा विद्यार्थ्यांचे पुढील परीक्षेचे परीक्षा अर्ज भरुन घेण्याची मुदत संपलेली असते, अशा विद्यार्थ्यांचा पुढील परीक्षेचा अर्ज भरुन घेण्या संदर्भात परीक्षक नियुक्ती विभागाने काढलेल्या परीक्षा अर्जाच्या परीपत्रकामध्ये अत्यंत महत्वाच्या सूचनामध्ये क्रमांक ९ मध्ये उशिरा जाहिर झालेल्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहिर झाले पासून विना विलंब ७ दिवसामध्ये भरुन घेण्याबाबतची सविस्तर सूचना दिलेली आहे.

याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, ऑनलाईन प्रणालितील व डाटा मायग्रेशन (एमकेसिएल प्रणालितील) मधील विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे निकाल पात्रता, परीक्षा प्रमाद व काही तांत्रिक अडचणीमुळे निकाल उशिरा जाहिर होतील अशा विद्यार्थ्यांचे ऑक्टोबर, २०१८ या हिवाळी सत्राचे परीक्षा अर्ज निकाल जाहिर झालेपासून सात दिवसाचे आत विना विलंब भरुन घ्यावेत. सदर अर्ज ऑनलाईन प्रणालित भरुन घेण्याची सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करुन दिली जाईल त्यानंतर ते ऑनलाईन भरावेत, त्याच्या स्वतंत्र यादया, परीक्षा शुल्काच्या पावतीसह संबंधीत परीक्षा विभागामध्ये त्वरित जमा करावेत.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
उपकुलसचिव